# राशिभविष्य - जुलै, २०१२.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==================================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात अत्यंत सावधानतेने व मन आणिबुद्धीवर ताबा ठेवून व जिभेला लगाम घालून आचरण करणेच हितावह होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक जीवनात काही मनोनुकुल घटना घडणार असल्या, तरी शनि-मंगळ-हर्षल या विरोधी ग्रहांमुळे असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णतेच्या विकारांचे आजार सहान करावे लागण्याची शक्यताही दिसते. तसेच मन व बुद्धीवर येणारा ताण सहन करावा लागण्याची शक्यताही नाकारता येत नाही. जपा. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच सर्व दृष्टींनी अनुकुल व लाभदायक होईल. शास्त्रीय संशोधन, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना कष्ट व मनस्ताप सहन करूनच काही प्रमाणात अर्थलाभ होऊ शकेल. या राशीच्या ज्या मंडळीना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य आहे त्यांनी तो मोह टाळावाच. महिन्याच्या उत्तरार्धात विविध प्रतिकुल अशा घटनांनी कौटुंबिक सुखी जीवनात बाधा येईलसे दिसते. व्यसनी, कुमार्गी मित्रांपासून दूर राहा.अध्यात्मात रस असेल श्रीगणेश व श्रीहनुमानउपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात वैवाहिक जीवनात अकारण बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कारण पतिपत्नीपैकी कोणाचेही आजारपण, दोघांमधील वैचारिक मतभेद, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. तसेच मुलांपैकी कोणाचा आजार वा आचरणविषयक समस्याही वादाचा विषय होऊ शकेल. जपा. त्यामुळे संततिसुखातही बाधा येणे शक्य आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांना जडत्व येणे, काही करू नयेसे वाटणे, अभ्यासेतर गोष्टींकडे अधिक ओढा असणे, काही आजार होणे, मित्रांशी भांडण होणे अशापैकी कारणांमुळे मनापासून अध्ययन करणे जमणार नाही. पालकांनी लक्ष द्यावे. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. पण महिन्याच्या पूर्वार्धात आप्तेष्ट भांडणे, डोळ्याचे आजार, वाढता खर्च, फ़सवणूक अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत असणाऱ्या मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण द्रव पदार्थांचे व्यापारी, मानसोपचारतज्द्न्य यांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईल. अन्य व्यवसायांत अस्थिर परिस्थिती राहील. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन** - या राशीच्या ज्या मंडळींना मनापासून अध्यात्मात रस आहे अशांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे सहज शक्य होईल. राशीच्या काही आध्यात्मिक दृष्ट्या प्रगत असणाऱ्या मंडळीना सूचक स्वप्ने पडण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना परदेशगमनाचे योग संभवतात. सामाजिक कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व सात्विक सुखशांती देणारा असल्याेचा अनुभव येईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र स्वभाव लहरी, विक्षिप्त होण्याची शक्याता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने मनस्ताप देणाऱ्या घटना घडून शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी शनि-मंगळ हे शत्रु ग्रह असल्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडतील, घरातील मंडळीशी वाद, भांडणे होणे, राहत्या जागेबाबत त्रास होणे, स्थावर संपत्तीबाबातबाबत त्रास होणे अशापैकी घटना घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. फ़सवणूक होणेही संभवते. जपा. या राशीच्या ज्या मंडळीचा परधर्मीयांशी व्यापार-व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे अधिक अर्थलाभ होणे संभवते.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-बुध हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल आहेत. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडतील व त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात या प्रतिकुल परिस्थितीचा परिणाम म्हणून शारीरिक-मानसिक अनारोग्य बळावण्याची शक्यता दिसते. जपा. ज्यांना हृदयविकार, रक्तदाब असे आजार आहेत त्यांनी अति विचार करू नये व मन शांत राखण्याचा प्रयत्न करावा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि-मंगळामुळे दुखापत, हाडमोड, इजा असे काही होणे संभवते. जपा. पण या राशीच्या युवकयुवतीना उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही दिसते. धैर्य, हिंमत, कर्तबगारी, महत्त्वाकांक्षा वाढेल. मात्र भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. जपा. दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण राहूमुळे कौटुंबिक जीवनातील सुखात व संततिसुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायी होईल. तसेच काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही शक्य आहे. नेपच्यूनमुळे जलभय, विषभय आहे. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेले गुरु-शुक्र इच्छा-आकांक्षा पूर्ण करू शकणारे असले, आर्थिक मनोकामना पूर्ण करू शकणारे असले तरी राहू-केतुमुळे त्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते.

**(५) सिंह -** तुलनात्मक दृष्ट्या या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच थोडा बरा जाईल. पण उत्तरार्धात मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच प्रतिकुल परिस्थितीला, घडणाऱ्या घटनांना धैर्याने सामोरे जावे लागेल. शारीरिक उष्णता भडकून घसा, दाढा, मान, डोळे यांपैकी कसला तरी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच कुटुबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यताही जाणवते. जपा. दाम्पत्यजीवनातील सुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. अपघातभय आहे. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. कलात्मक व तांत्रिक व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. पण उच्च बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. सध्या या राशीच्या मंडळींनी नवीन काही सुरू करण्याचा प्रयत्नही करू नये. वर्तमान नोकरी असेल तर तीच व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सर्वच नोकरदार मंडळीना प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभेलच याची खात्री नाही. ज्यांची कोर्ट प्रकरणे असतील त्यांनी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. खर्चाचे प्रमाण वाढून आर्थिक चिंता करावी लागेल. जपा. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी मन शांत ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. व अति विचार न करता स्वस्थ राहावे आणि अनुकुल/प्रतिकुल जे काही घडेल ते सहन करून त्याला तोंड देण्याची मनाची तयारी करावी. संतापाच्या भरात काही वेडेवाकडे बोलाल तर त्याचा तुम्हांलाच त्रास होईल. अकारण अति श्रम व दगदग करून आजारपण ओढवून घेऊ नका. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घाला. घरीदारी मनाविरुद्ध घटनाच घडतील हे गृहीत धरून नम्रतेचे आचरण केल्यास होणारा त्रास सुसह्य होईल. विविध कारणांनी कुटुंबातील सदस्यांचे स्थलांतर होणे संभवते. असह्य मनस्तापामुळे जीवनसाथीची आरोग्यविषयक समस्या बळावण्याची शक्यता दिसते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल होईल व विविध प्रकारचे लाभ पदरी पडतीलसे दिसते. राहूमुळे बंधुसुखात तर केतुमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे. आध्यात्मिक प्रगती साधणे व मन:शांती मिळवणे शक्य होईल. शुक्राच्या अनुकुलतेने गुरुकृपा प्राप्त होईल व सुसंगती लाभून थोरकृपा प्राप्त होईल. या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना होणे संभवते. त्यामुळे काल्पनिक चिंता करून अकारण मनस्ताप होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान

उपासना अनुकुल होतील व त्यामुळे मन व बुद्धी सशक्त राहून सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील.

**(७) तुळा** - सध्या या राशीच्या मंडळींचे मन व स्वभाव अतिशय भावनाप्रधान झाला असण्याची दाट शयता आहे. अशा परिस्थितीत व्ययस्थानी असलेले शनि-मंगळ सर्व प्रकारे असह्य मनस्ताप देण्याचा प्रयत्न करतील. त्यासाठी काळ अध्यात्मिक प्रगतीस अनुकुल असल्याने उपासनेद्वारे मन व बुद्धी सशक्त राखणे शक्य होईल. श्रीगणेश व श्रीहनुमान यांची उपासना अनुकुल होईल व त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच थोडाफ़ार अनुकुल व सुखशांतीदायक होईल असे वाटते. अकारण अति विचार करू नका. नपेक्षा डोकेदुखीचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. काहींना मुदतीच्या तापाला सहन करावे लागेल. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ वा वारसा धन मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ, काहींना मानाचे स्थान तर काहीना बढती मिळू शकेल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात रत असतील त्यांना प्रगती, यश व अर्थलाभ होणे शक्य आहे.. राहूकेतुमुळे कौटुंबिक व संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीव्यवसायात प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. महिन्याचा उत्तरार्ध मात्र बराच अनुकुल होईल. एकंदरीत पाहता संमिश्र प्रकारचे अनुभव देणारा असा या महिन्याचा काळ असणार आहे.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळींना सध्या गुरु ग्रह अनुकुल असला तरी शुक्र व केतु फ़ारसे अनुकुल नाहीत. तरी या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-गाहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल किंवा आर्थिक नुकसान होईल. जपा. केतुमुळे अपघात भय आहे. जपा. तसेच दांपत्यजीवनात जीवनसाथीस कसला तरी त्रास होणे संभवते. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. कुसंगतीपासून दूर राहावे. मन अस्वस्थ व बुद्धी अस्थिर होणे संभवते. तसे झाल्यास गुरुशी संबंध असल्यामुळे या राशीच्या काहींना वैराग्य येणे संभवते. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. असे असले तरी गुरुच्या अनुकुलतेने या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग येणे शक्य आहे. तसेच प्रेमसंबंध असतील तर ते घट्ट होतील. तसेच नवे स्नेहसंबंध जुळून येणेही संभवते. या राशीच्या काही मंडळीना प्रवासयोग येतील. पण लाभस्थानी असलेल्या शनिमंगळामुळे या राशीच्या मंडळींना काहीही कारणाने संततिसुख लाभणे अशक्य होईल. मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येतील. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. पण या राशीच्या काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य आहे. काहींना वातविकारांचा त्रास सहन करावा

लागेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(९) धनु** - स्वत:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्य, मतभेद, भांडणे अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळीच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. नोकरीतही कामाचा असह्य ताण पडून वरिष्ठांशी वाद, मतभेद होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. अशा परिअस्थितीत या राशीच्या काही मंडळींची शारीरिक उष्णता भडकून त्यांना उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळीना ताप येणे, पोट बिघडणे, अपचन होणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायातही खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या युवकांना स्वतंत्रपणे काही नवीन करावेसे वाटेल. विशेषत: दिनांक २३-२४ या दोन दिवशी काही अविस्मरेणीय घटना घडल्यास कळवा. अध्यात्मात विशेष रास असणारांना मात्र उपासनेद्वारे मानसिक शांती लाभेल. या राशीच्या काही जणांना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. कोणाशीही न पटवून घेण्याच्या मनस्थितीमुळे गृहसौख्यात बाधा येणे शक्य आहे. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मन-बुद्धीवर पडणारा ताण कमी होईल. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(१०) मकर** - या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आर्थिक व्यवहार सावधानतेने करावेत. आर्थिक येणे असलेल्या बाबतीत घोटाळे निर्माण होणे संभवते. शिवाय अकस्मात आर्थिक खर्च निर्माण होणे संभवते. शासकीय, निम-शासकीय सेवेत असणाऱ्या या राशीच्या मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. म्हणून जे काही साधावयाचे ते पूर्वार्धातच साधण्याचा प्रयत्न करा. विशेष करून उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यात रत असलेल्या मंडळीना प्रगती, यश व समाधान या दृष्टीने काळ अनुकुल होईल. तसेच धर्म, वेदान्त अशा आध्यात्मिक कार्यात रत असणारांनाही काळ अनुकुल होईल. पण या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असला तरी काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होणे संभवते. अपेक्षित कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात दांपत्यजीवनात मतभेद, भांडणे होणे संभवते. तसेच स्वत:चे किंवा जीवनसाथीचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. विशेष करून पोटाचे विकार, अपचन, ताप येणे अशापैकी आजार संभवतात. जपा. शक्यतो दूरदूरचे प्रवास टाळा. कारण त्रास व मनस्ताप सहन करावा लागणे संभवते. राहू-केतुमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. जुगाराचा नाद असेल तर आर्थिक नुकसानच होईल. जपा. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने सात्विक सुखसमाधान लाभेल.

**(११) कुंभ** - या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन व बुद्धी अस्वस्थ, चंचल

होण्याची शक्यता दिसते. तसेच स्वभाव विक्षिप्त होणे संभवते. त्यामुळे कोणाशीही पटणार नाही. अविचाराने आचरण होईल जपा. फ़टकळ बोलून कोणाचेही मन दुखावले जाण्याची शक्यता आहे. म्हणून मन व बुद्धीवर ताबा ठेवा जिभेला लगाम घाला व सहनशीलतेचे आचरण करा. तेच सुखाचे होईल. तसे आचरण केलेत तर गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने प्राप्त होणाऱ्या कौटुंबिक सुखासमाधानात बाधा येणार नाही. या राशीच्या काहींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. काहींना उष्णताविकारांचा असह्य त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काहींना मूळव्याधीचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण नातेवाईक मंडळीकडून त्रास होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारचे आरोग्य जपावे लागेल. अपघातभय आहे. जपा. शनिमुळे सतत अपेक्षाभंग होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायास काळ अनुकुल असून मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील. या राशीच्या ज्यांना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य आहे त्यांनी तो मोह कटक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन** - हर्षलमुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी, धाक, दडपण असह्य होणारा असा झाला असण्याची दाट शक्यता आहे. य़ा राशीची लहान मुले तर अत्यंत हूड, व्रात्य अशा आचरणाची असण्याचा संभव दिसतो. पण या राशीच्या ज्या मंडळींचे कार्यक्षेत्र शास्त्रीय संशोधनात्मक असे आहे त्यांना मात्र हा हर्षल अतिशय अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. नेपचूनमुळे या राशीच्या मंडळींना मानसिक व्यग्रता, नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व यशदायक होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. काही मंडळीना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काहीना भूमिलाभ तर काहीना मान, प्रतिष्ठा प्राप्त होईल. पण बंधुवर्गाकडून थोडा मनस्ताप दिला जाणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात गृहसौख्यात बाधा येणे संभवते. तर उत्तरार्धात अपघातभय संभवते. शनिमंगळ वैवाहिक जीवनात मनस्ताप देतील, कोर्ट प्रकरणात अपयश देतील, भागीदारी व्यापार-व्यवसायात अडथळे निर्माण करतील. जपा. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत कार्यरत असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखले तरच ते शैक्षणिक प्रगती करू शकतील.